“संशोधन आराखडा”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयात विद्यावाचसाती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

* संशोधन विषय *

“भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद : एक चिकित्सक अभ्यास”

* संशोधक *

अनिल नारायणराव पंडित

एम. ए. एम. एड.

* मार्गदर्शक *

प्रा. डॉ. महादेव बी. बेलखेडे

राज्यशास्त्र विभाग प्रमुख

पानसरे महाविद्यालय, अर्जापूर

ता. बिलोली जि.नांदेड

* संशोधन केंद्र *

पीपल्स कॉलेज, नांदेड

सन 2022 - 2023

अनुक्रमणिका

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्रमांक
1	प्रस्तावना	1-4
2	संशोधन विषय निवडीचे महत्त्व	5
3	समस्या सुत्रण	6
4	संशोधनाची उद्दिष्टे	7
5	संशोधनाची गृहितके	7
6	संशोधनाची पध्दती	8
7	संशोधन विषयाची व्याप्ती	9
8	पूर्वसंशोधन साहित्याचा आढावा	9
9	प्रकरण विभागणी	10-14
10	संदर्भग्रंथ सूची	15-18

"भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद : एक चिकित्सक अभ्यास"

प्रस्तावना :

भारत देशात पूर्वीपासून धर्म व जात यांच्या आधारे सामाजिक विषमता समाजात होती. वर्ण व्यवस्थेद्वारे समाजातील विशिष्ट वर्गाला विशेष अधिकार प्राप्त झालेले होते. काही वर्गाला मानव म्हणून जगण्याचाही अधिकार नव्हता. त्यांना सामाजिक अधिकार नाकारण्यात आले होते. या परिस्थितीत कालांतराने बदल घडून आले. परकीय सत्तानी येथे राज्य करताना वसाहती स्थापन केल्या. भारतातील समाजसुधारकांनी प्रबोधन व शिक्षणाच्या माध्यमातून जातिव्यवस्था, धर्मसुधारणा समाजातील विषमता दूर करण्याचा प्रयत्न केला. शिक्षित समाजामुळे विषमता असलेल्या भारतीय समाजात एकात्मता निर्माण होण्यास पोषक वातावरण निर्माण झाले. ब्रिटिशांची सत्ता भारतात होती. राष्ट्रवाद या विचारातून लोक एकत्र येऊ लागले. स्वातंत्र्य लढा उभा राहिला. भारत देश स्वतंत्र झाला. भारताचे संविधान निर्माण झाले.

भारतीय संविधानाची निर्मिती ही उत्तर - वसाहतिक कालखंडातील घटनानिर्मितीचा पहिला महत्वपूर्ण प्रयत्न हा मानला जातो. ब्रिटिश राजवटीत कायद्याचे अधिराज्य, मानवतावाद, धर्मनिरपेक्षता, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता, लोकशाही या आधुनिक मूल्यांची भारतीय समाजाला ओळख झाली. दुसऱ्या बाजूला आधुनिक शासनसंस्थेचा पाया हा रोवला गेला. अनेक संस्थाने, राजेरजवाड्यांमध्ये विभागल्या गेलेल्या भारतीय भूप्रदेशाचे प्रशासकीय ऐक्य साधले गेले. आधुनिक मूल्यांची ओळख व प्रसार, धर्म व समाजसुधारणा इ. घटकांमुळे भारतीयांमध्ये राष्ट्रवादाचे बीजारोपण झाले होते. यातूनच स्वातंत्र्य चळवळ आकारास येऊन स्वातंत्र्य प्राप्तीचे उद्दिष्ट निश्चित झाले. या प्रक्रिये व्दारे भारतीय संविधानाची जडणघडण झाली हे दिसून येते.

भारतीय नागरिकांनी आपण स्वतःहुन स्वीकारलेली भारतीय राज्यघटना ही स्वत: प्रत अर्पण केलेली आहे. देशातील नागरिकांना समान हकक मिळून स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता उच्च जीवन जगण्याची संधी हेच फलीत आहे सूक्ष्म पध्दतीने पाहल्यास असे दिसून येते की भारतीय समाज रचना ही जाती, धर्म, वंश, रूढी, प्रथा, परंपरा निर्माण झालेली आहे. जातीभेद भारतीय संविधनाची अंमलबजावनी होऊन संविधानाच्या तरतूदी व कायदा हे सर्वांना समान पद्धतीने नागरिकांना समान अधिकार प्राप्त झाले. राष्ट्र निर्मिती मध्ये संविधानाची महत्वाची भूमिका आहे. ज्यात विशिष्ट

भूप्रदेशावरील लोकांचे एक राष्ट्र घडवणार संविधान आहे. हा मूलभूत, तात्वीक व कायदेशीर आधार आहे. संविधान हे प्रत्येक नागरिकांना नियम व आचरणातून एका समान धारेत एकत्र ठेवण्याचे कार्य करतो. राष्ट्र या संकल्पनेच्या चैतन्यशील चलनवलनात संविधान या घटकाला महत्वपूर्ण असे स्थान असते.

राष्ट्र ही संकल्पना अत्यंत आवश्यक आहे. मुलभुत घटकांना केंद्रस्थानी ठेवून राष्ट्र संकल्पने संदर्भात पृथ्वीवरील नैसर्गिक अथवा कृत्रिम सीमांनी बंदिस्त असलेल्या विशिष्ठ भूप्रदेशावरील असे लोकं, की ज्यांचे मूलभूत हितसंबंध सारखे आहेत. जे आपल्या भूप्रदेशासंदर्भात नजीकच्या इतिहासाकडून प्रेरणा घेऊन नवराष्ट्र निर्माणाच्या उदात ध्येयवादाने परकीय सत्ता झुगारून स्वातंत्र्य व सार्वभौतत्व प्राप्त केले आहे. देशातील नागरिकांना आपल्या देशा बद्दल अभिमान असतो. कोणत्याही देशाच्या राजकीय व्यवस्थेला काही ऐतिहासिक वारसा राजकीय व्यवस्थेचे विचार करतांना ऐतिहासिक परंपरा व पार्श्वभूमी विचारात घेणे महत्वाचे आहे. भारतावर ब्रिटिशांनी प्रदीर्घ काळ राज्य केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून बजावलेल्या भूमिकेबरोबरच भारतीय संविधानाच्या 'उदारमतवाद' आणि 'लोकशाही' या पायाभूत आधारांचे वैचारिक समर्थन पुरवण्याची महत्वपूर्ण भूमिका बजावली. 'व्यक्ती मूल्य प्रस्थापित केल्याशिवाय मानवी विकास अशक्य आहे. 'हे उदारमतवादी तत्व भारतातही 'अंगिकारणे आवश्यक आहे आणि स्वातंत्र्याची प्रस्थापना केल्याशिवाय व्यक्ती विकास साध्य करता येणार नाही, असा युक्तिवाद मांडला. तसेच 'लोकशाही हा शासनाचा असा प्रकार व पद्धती आहे ज्याद्वारे लोकांच्या सामाजिक व आर्थिक जीवनात कोणत्याही पक्षपाताशिवाय क्रांतिकारी बदल साध्य करता येतात. असे प्रतिपादन करत भारतीय समाजासाठी लोकशाही व्यवस्थेचे समर्थन केले. अर्थात, भारतातील वैशिष्टयपूर्ण सामाजिक संदर्भात पश्चिमी धाटणीचा उदारमतवाद व लोकशाही अपुरी ठरेल हे जाणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामूहिक हक्क आणि सामाजिक संदर्भात पश्चिमी धाटणीचा उदारमतवाद व लोकशाही या संकल्पनांची मांडणी केली. भारतात लोकशाही संविधानवाद रुजविण्यासाठी घटनात्मक नैतिकता आत्मसात करण्याची गरज अधोरेखित केली. घटनात्मक नैतिकता ही स्वाभाविक भावना नव्हे; तर जाणीवपूर्वक अंगिकारण्याची बाब आहे. भारतासारख्या विषमतापूर्ण समाजात लोकशाही हे एक बाह्य आवरण आहे. म्हणून सामाजिक जीवनात स्वातंत्र्य, समता व

बंधुभगिनी भावावर आधारित विचार प्रस्थापित होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी लोकशाही केवळ राजकीय जीवनापुरती मर्यादित न राहता सामाजिक, आर्थिक जीवनात प्रस्तुत झाली पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्य लढयातून पुढे आलेला हा संमिश्र स्वरूपाचा वैचारिक वारसा हा राज्यघटनेचा तत्ववैचारिक स्त्रोत मानता येतो. आधुनिक भारतीय इतिहासाचे अभ्यासक बिपिन चंद्रा यांनी भारतीय स्वातंत्र्यलढा म्हणजे भिन्न स्वरूपाच्या वैचारिक प्रवाहाचे एक गाठोडेच होते असे म्हटले. बहुल वैचारिक चौकटी संदर्भाताच राज्यघटना तयार केली हे लक्षात येते. भावी राज्याचे स्वरूप व भूमिका शासनप्रकार यांविषयी घटना समितीतील विवाद अभ्यासल्यास ही बाब ठळकपणे लक्षात येते.

भारतीय संविधानात व्यक्तींचा विचार व राष्ट्रवाद तसेच धर्मनिरपेक्ष संबंधी तरतुदी केलेल्या आहेत.

1) कलम 15 - धर्म, वंश, लिंग, किंवा जन्मस्थळ या आधारावर भेदभावास प्रतिबंध

2) कलम 26 - सार्वजनिक सेवेमध्ये संधीची समानता.

3) कलम 17- अस्पृश्यता निवारण.

4) कलम 25 - सद्सदविवेकाचे स्वातंत्र्य आणि धर्माचा प्रसार, प्रचार आणि व्यवहाराचे स्वातंत्र

5) कलम 26 - धार्मिक व्यवहारांचा व्यवस्थापनाचे स्वातंत्र्य.

6) कलम 27 - एका विशिष्ट धर्माच्या संवर्धनासाठी कर देण्याची सक्ती करता येणार नाही.

7) कलम 28 - ठरावीक शैक्षणिक संस्थांमध्ये धार्मिक शिक्षण किंवा धार्मिक उपासनांना उपस्थित राहण्याचे स्वातंत्र्य.

8) कलम 29 - अल्पसंख्याकांच्या हिताचे संरक्षण.

9) कलम 30 - शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्याचे प्रशासन चालवण्याचा अल्पसंख्याकांचा हक्क.

10) कलम-325 - धर्म, वंश, जात वा लिंग याआधारे मतदार यादीमधून वगळण्यास वा समावेश करण्यास, किंवा विशेष यादीत नमूद करण्यास प्रतिबंध.

भारतीय संविधान हे संमिश्र स्वरूपाचे असून संघराज्यात्मक आणि एकात्म आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वेळ आणि परिस्थितीनुरूप संविधान दोन्हीही एकात्म त्याचबरोबर संघराज्यात्मक स्वरूप धारण करते. भारतीय संविधान साधारण परिस्थितीमध्ये संघराज्य

व्यवस्थेप्रमाणे कार्य करेल तर आणीबाणीसदृश्य परिस्थितीमध्ये तिला एकात्म व्यवस्थेप्रमाणे कार्य करता येईल." डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटना समिती पुढेही स्पष्ट केले होते की, "संघ हा शब्द जाणीवपूर्वक योजलेला आहे. मसुदा समिती हे स्पष्ट करू इच्छिते की, भारत हे एक संघराज्य असेल. परंतु, संघराज्यामध्ये सामील व्हायचे म्हणून एकत्र येऊन करार केलेल्या राज्यांचे हे संघराज्य नाही. याशिवाय, या संघराज्यातून फुटून बाहेर पडण्याचा अधिकार कोणत्याही घटकराज्याला नाही. प्रशासनाच्या सोयीसाठी देश आणि देशातील लोकांचे विविध राज्यांमध्ये विभाजन केलेले असले तरी हा संपूर्ण देश एक आहे, त्यातील लोक एक असून एका स्त्रोताकडून निर्माण झालेल्या एका राजवटीखाली ते राहत आहेत. भारतीय राज्यघटना आणि घटनात्मक प्रक्रियेचे सुप्रसिद्ध विश्लेषक ग्रॅनव्हिल ऑस्टिन यांनी प्रचलित वर्गवारी शिवाय वेगळया रितीने संविधानाच्या स्वरुपाबाबत भाष्य केलेले आहे. ऑस्टिन यांनी द इंडियन कॉन्स्टिट्यूशन: कॉर्नरस्टोन ऑफ अ नेशन या ग्रंथामध्ये संविधान निर्मितीचा राजकीय इतिहास प्रतिपादन करताना भारतीय संविधान निर्मिती म्हणजे 1787 साली अमेरिकी संविधान स्वीकारल्या नंतरचे हे सर्वोच्च राजकीय साहस असल्याचे म्हटले आहे. भारतीय राज्यघटनेच्या स्वरुपाबाबत नोंद करताना याच ग्रंथात ते म्हणतात की, सर्वप्रथम, भारतीय राज्यघटना हा एक सामाजिक दस्तऐवज आहे "त्यांच्या मते, "घटना समितीची सामाजिक आणि आर्थिक क्रांतीची इच्छा राज्याच्या मार्गदर्शक धोरणांतून स्पष्ट होते. "म्हणूनच प्रस्तुत संविधान हे कायदे व नियम यांचा एक संच नाही तर स्वातंत्र्य लढ्यातून पुढे आलेल्या मूल्यांचा आविष्कार करणारी आहे, हे लक्षात येते.

भारतीय राष्ट्राची एकता अखंडता सार्वभौमत्व अधिकार यांची हमी देते. प्रत्येक नागरिकांना संविधानाने दिलेले मुलभूत अधिकार यांचे संरक्षण करण्याची व संविधानाशी एकनिष्ठ राहण्याची विचारधारा सर्वांना प्रेरित करते.

संशोधन विषय निवडीचे महत्त्व:

“भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद: एक चिकित्सक अभ्यास" या संशोधन कार्याचीआवश्यकता यासाठी आहे, २६ जानेवारी १९५० या दिवशी भारतीय संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. तेव्हापासुन भारतातील राजे, सरंमजदार कायदेशीररीत्या संपुष्टात आले आणि भारत राष्ट्र बनला. देशाची अंतीम सत्ता देशातील सामान्य नागरिकांच्या हाती असते. भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद या संकल्पनेत काळा प्रमाणे अनेक बदल झालेले दिसतात. या सर्वांचा अभ्यास होणे गरजेचे आहे. त्याकरिता प्रस्तूत संशोधन कार्याची निवड करण्यात आली आहे.

समस्या सुत्रण:

भारत हा विविधतेत एकता असणार देश मानला जातो. इथे अनेक जाती, धर्म, पंथ असणारे लोक एकत्र राहतात. भारतावर अनेक सत्तांनी राज्य केलेले आहे.

ब्रिटिशांनी भारतावर १५० वर्षे शासन केले. मात्र त्यांच्यापासुन स्वतंत्र झाल्यानंतर भारताने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

कोणत्याही देशासाठी संविधान हे प्रगतीचे आश्वासन असते. भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवादाला अत्यंत महत्व आहे.

संविधाननिष्ठ राष्ट्रवाद नैसर्गिक सत्यावर मानवी मुल्यांवर आधारलेला आहे. तो व्यापक आहे. वैयक्तिक, धर्म, पंथ, संस्कृती ही प्रत्येकाच्या वैयक्तिक जीवनापूरती मर्यादित असते. राष्ट्रहित सर्वांत अगोदर गृहित धरून कार्य करणे हे संविधाननिष्ठ राष्ट्रवादात आवश्यक आहे. संविधानात सर्व नागरिकांची राष्ट्रीय एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देवून भारतीय जनतेने केलेल्या व्यापक व उदात्त अशा संकल्पनावर निष्ठा ठेवून वर्तन करणे म्हणजे भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद होय.

राष्ट्रवाद, संविधाननिष्ठ राष्ट्रवाद या संकल्पना काळानुसार कशा बदलेल्या आहेत?

“भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद” या विषयाची निवड संशोधन अभ्यासासाठी केली आहे. प्रस्तुत संशोधक आपले संशोधन कार्य पूर्ण करणार आहे. वरिल समस्यासुत्रणाच्या आधारे प्रस्तुत संशोधक आपले संशोधन कार्य पूर्ण करणार आहे.

उददिष्टये:

1) भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद संकल्पनेचा अभ्यास करणे.

2) भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद हे सर्वसामवेशक आहे हे स्पष्ट करणे.

3) राष्ट्रवादाच्या उदयाची प्रक्रिया स्पष्ट करणे.

4) संविधाननिष्ठ राष्ट्रवादाची भूमिका ही राष्ट्रनिष्ठ स्वरूपाची आहे हे स्पष्ट करणे.

5) भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद बौध्दिक व वैज्ञानिक दृष्टीकोनावर आधारित आहे हे स्पष्ट करणे.

गृहितके:

1) भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद ही संकल्पना व्यापक आहे.

2) भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद हे सर्वसमावेशक आहे हे स्पष्ट करणे.

3) राष्ट्रवादाच्या उदयाची प्रकिया बहुआयामी आहे.

4) संविधाननिष्ठ राष्ट्रवादाची भूमीका ही राष्ट्रनिष्ठ स्वरूपाची आहे.

5) भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद बौध्दिक व वैज्ञानिक दृष्टीकोनावर आधारित आहे.

संशोधन पध्दती:

"भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद : एक चिकित्सक अभ्यास"

प्रस्तुत संशोधन विषयासाठी विश्लेषणात्मक पध्दत, निरिक्षण संशोधन पध्दत,, ऐतिहासिक संशोधन पध्दत, वर्णनात्मक संशोधन पध्दत यांचा अवलंब केला जाणार आहे.

तथ्यसंकलन:

संशोधनास विशिष्ट स्वरूपाचे मार्ग प्राप्त करुन देण्याचे साहित्य म्हणजे तथ्य संकलन होय. तथ्य संकलन हे संशोधनातील महत्वाचे व प्राथमिक कार्य आहे. प्रस्तुत संशोधन विषयाची माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोतांचा अवलंब करण्यात येणार आहे.

प्राथमिक स्त्रोत:

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या माहितीचे संकलन करण्यासाठी प्राथमिक तथ्य संकलनाच्या माध्यमातून भारतीय संविधान, संविधानिक तरतुदी, शासनाचे परिपत्रक यांचे संकलन केले जाणार आहे.

दुय्यम स्त्रोत:

या संशोधनासाठी दुय्यम स्रोत साधनांमध्ये संबंधित विषयावरील महत्ववपूर्ण ग्रंथ, मासिके, नियतकालिके, अप्रकाशित लेख, वर्तमानपत्रे व इंटरनेट इ. साधनांच्या माध्यामातून माहिती मिळविली जाणार आहे.

संशोधन विषयाची व्याप्ती :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठीची व्याप्ती ही भारतीय संविधाना पूरती आहे.

कोणत्याही संशोधन कार्याची व्याप्ती व मर्यादा निश्चित करणे गरजेचे असते. त्यामुळे एखादे संशोधन हे त्या क्षेत्रापुरते मर्यादित होते. संशोधकाला यामुळेच संशोधन कार्या मध्ये सहजता येते. तसेच यामुळे निश्चित क्षेत्रापुरते संशोधन होण्यास मदत होते.

“भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद : एक चिकित्सक अभ्यास"

या प्रस्तुत संशोधन कार्याची व्याप्ती ही भारतीय संविधान पूरती आहे.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा:

भारतीय संविधान या संदर्भाने संशोधन झाले आहेत. तसेच राष्ट्रवाद या विषयावर संशोधन झाले आहेत. या विषयांच्या संदर्भाने वेगवेगळे दृष्टीकोनातून संशोधन कार्य झाले आहेत. मात्र “भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद” या विषयी संशोधन फारसे झालेले दिसत नाही.

या प्रस्तुत संशोधनातून हे कार्य करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

प्रकरण विभागणी:

1) प्रस्तावना

2) भारतीय संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

3) राष्ट्रवादाचा उदय व विकास

4) संविधाननिष्ठ संकल्पना आणि संविधान सभेतील विचारमंथन

5) भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद

6) निष्कर्ष

प्रकरण 1

प्रस्तावना

हे प्रकरण पहिले असून यामध्ये विषय प्रवेश, संशोधन समस्या, संशोधनाचे महत्व, संशोधनाची उददिष्टये, संशोधनाची गृहितके, संशोधन पद्धती, तथ्य विश्लेषण, तथ्य संकलन, अध्ययन क्षेत्र व संशोधन आराखडा यांची माहिती घेण्यात येणार आहे.

प्रकरण 2

भारतीय संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

हे प्रकरण दुसरे असून यामध्ये भारतीय संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी ही संकल्पना स्पष्ट करण्यात येईल. भारताला पुरातन ऐतिहासिक वारसा लाभला आहे.

भारत देशाला 15 ऑगस्ट 1947 ला स्वातंत्र्य प्राप्त झाले. भारतात तत्कालीन समाजात विषमता होती, भारतात विविध धर्म,पंथ असणारे लोक राहतात. परंतु तरीही देशाला स्वतंत्र करण्यासाठी ब्रिटिशांविरूद्ध एकत्रीतपणे स्वातंत्र्यलढा उभारण्यात आला. तो राष्ट्रवाद या घटकावर आधारलेला होता. राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्राविषयी एकात्मतेची भावना बाळगणे होय.

ब्रिटीशांचे शासन संपुष्टात आणण्यासाठी विविध मार्गांनी भारतात प्रयत्न केले गेले. याद्वारे स्वातंत्र्यलढा उभारण्यात आला. भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले. स्वतंत्र भारताने स्वत: चे संविधान निर्माण केले. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, हे घटक भारतीय संविधानाचे मूलभूत तत्त्वज्ञान आहे. भारताच्या संविधानात या सर्वांचा समावेश करण्यात आला आहे. यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण 3

राष्ट्रवादाचा उदय व विकास

हे प्रकरण तिसरे असून या प्रकरणामध्ये राष्ट्रवादाचा उदय व विकास यांचा अभ्यास करण्यात येईल. भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही ऐतिहासिक घटनांची मालिका होती, ज्याचा उद्देश भारतातील ब्रिटिश राजवट संपुष्टात आणणे हा होता.

देशातील युवकांना विशेषत: देशभक्तीचे महत्व पटवून देण्यासाठी अनेक व्यक्तीनी सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविला आणि आपल्या कार्यातून देशातील नागरिकांना आवाहन केले. स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, रवींद्रनाथ टागोर, लाला लजपतराय, दादाभाई नौरोजी यासारखा अनेक व्यक्तीचे योगदान महत्वाचे ठरले.

अशा प्रकारे भारतीय राष्ट्रवादाचा उदय व विकास यांचा सखोल आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण 4

संविधाननिष्ठ संकल्पना आणि संविधान सभेतील विचारमंथन

हे प्रकरण चौथे असून संविधाननिष्ठ संकल्पना आणि संविधान सभेतील विचारमंथन हे स्पष्ट करण्यात येईल. ब्रिटीश इंडियामधील सामाजिक व राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळींनी केलेल्या वैचारिक पाया भरणीतून आजचे हे राष्ट्र निर्माण झाले आहे. भावी भारताचे नवराष्ट्र निर्मितीचे तत्वज्ञानच या कालखंडात विकसित होत होते. या तत्वज्ञानाच्या पायावरच व्यापक व सखोल असे विचार मंथन करुन प्रगल्भ भारतीय नेत्यांनी संविधानाची निर्मिती केली ही संविधानाची निर्मिती ही भारताच्या हजारो वर्षाच्या इतिहासातील अत्यंत क्रांतिकारी घटना आहे. संविधानातील मूल्यांशी एकनिष्ठाता असणे म्हणजे संविधाननिष्ठा होय. भारताची संविधान सभा ही भारताची संविधान समिती, भारताची घटना परिषद या अन्य नावांनी ओळखली जाते. भारताचे संविधान निर्माण करण्यासाठी भारताची संविधान सभा स्थापित करण्यात आली होती. भारताला ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संविधान सभेने भरताची पहिली संसद म्हणूनही काम केले.

या सभेत राष्ट्रनिर्माण विषयक विविध विचार पुढे आले होते. संविधान सभेत संविधानाचा मसुदा याविषयी अनेक खंडामध्ये चर्चा करण्यात आली. प्रस्तुत प्रकरणात या सर्वांचा सखोल आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण 5

भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद

हे प्रकरण पाचवे असून यामध्ये भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद यांचा सखोल अभ्यास केला जाणार आहे. २६ नोव्हेंबर १९५० पासून भारतात नव्या संविधान युगाची सुरुवात झाली. भारतीय संविधान हे विविधतेने नटलेल्या व जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत, संस्कृती इत्यादी घटकांमुळे परस्परांपासून भिन्न व वेगवेगळया भारत भूमीतील लोकांना एकराष्ट्रीयत्वाच्या पक्व धाग्यामध्ये गुंफण्याचे अत्यंत महत्वपूर्ण असे काम केलेले आहे. संविधान हे कल्पित घटकावर आधारलेले नसून, नैसर्गिक सत्याला भिडणारे व वास्तववादी आहे. संविधान भूप्रदेशातील नागरिकांमध्ये धर्म, जात, लिंग, वंश इत्यादी कारणांवरुन कोणताही भेदाभेद न करता सर्वांना माणूस म्हणून समान दर्जा देते, संविधानाच्या तत्वज्ञानात मानवी कल्याणाच्या मुल्यांना सर्वोच्च स्थान आहे, बुद्धिवाद व विज्ञानवादाला सर्वाधिक महत्व, संविधाननिष्ठ भविष्यवेधी दृष्टीकोन, एक राष्ट्र बनविण्याची प्रक्रिया आहे. भारतीय संविधानाच्या मुळाशी असलेले, जन्माधारती उच्चनीचतेला नाकारणारे मानव कल्याणकारी कायदा, संविधानाने पुरस्कारलेली जीवनमूल्ये, मूलभूत अधिकार व मूलभूत कर्तव्य यातून कायदा,संविधानाने भारतीय नागरिकांसाठी घालून दिलेली आचारसंहिता, राजकीय, सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक परिवर्तनासाठी उभ्या करून दिलेल्या अनेकविध संस्था, भारतीयांच्या समोर ठेवलेले आदर्श प्रतीके, समग्र भारतीयांच्यासाठिचे राष्ट्रीय सण, संशोधनसंस्था, औद्योगिक संस्था, सिंचन प्रकल्प व स्मारकाच्या स्वरुपातील नवी पर्यटन संस्कृति इत्यादी घटकांवर निष्ठा ठेवणाऱ्या राष्ट्रवादास संविधाननिष्ठ राष्ट्रवाद म्हणता येईल. अशा प्रकारे या प्रकरणामध्ये भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद या संकल्पनेचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 6

निष्कर्ष

“भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद : एक चिकित्सक अभ्यास" प्रस्तुत संशोधन कार्याचे हे अंतीम प्रकरण असून संशोधन कार्यातुन भारतीय संविधाननिष्ठ राष्ट्रवाद याविषयी जे निष्कर्ष प्राप्त होतील ते मांडण्यात येतील.

प्रस्तुत संशोधन आराखडा प्राथमिक स्वरुपाचा आहे.

संदर्भ सूची

संदर्भग्रंथ सूची:

1) कीर धनंजय, विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानस आणि तत्वविचार, गजेंद्र विठ्ठल रघुवंशी, रघुवंशी प्रकाशन शुक्रवार पेठ, पुणे
2) प्रा. पाटील व्ही. बी., समग्र राज्यशास्त्र के सागर पब्लिकेशन्स पुणे
3) प्रा. पाटील व्ही. बी., महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था के सागर पब्लिकेशन्स पुणे २००५
4) लक्ष्मीकांत एम., इंडियन पॉलिटी (मराठी अनुवाद श्रीकांत गोखले) संपादन : के सागर पब्लिकेशन्स पुणे
5) भोळे भा. ल., भारतीय शासन व राजकारण
6) डॉ. कुबरे वा. ना., भारताचा स्वातंत्र्यलढा : 1930-34, प्रकाशन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती : 2002
7) सिंह राजेश कुमार, राष्ट्रवाद, नोशन प्रेस प्रकाशन
8) डॉ. झा प्रभात, सांस्कृतिक राष्ट्रवाद, प्रभात प्रकाशन
9) प्रा. देशमुख भूषण, दाते निबिल, भारतीय कला आणि संस्कृतिक, सकल प्रकाशन
10) फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र (राजकीय इतिहास), खंड तिसरा 1921-1929, के सागर प्रकाशन पुणे

11) जाधव तुकाराम, भारतीय राज्यघटना व घटनात्मक प्रकिया, युनिक अकॅडमी प्रकाशन पुणे.

12) डॉ. त्रिपाठी सत्येनद्र, डॉ. व्दिवेदी कृष्णादत्ता, भारतीय राष्ट्रवाद (स्वरूप और विकास), विश्वविदयालय प्रकाशन.

13) NCERT 11TH AND 12TH BOOKS POLITICAL SCIENCE

14) GAUBA O. P. POLITICAL THEORY BY PUBLICATION BY K' SAGAR PUBLICATION

15) Desai A. R., 2011 Social Background of Indian Nationalism, Popular Prakashan Ltd., India

मासिके:

1) लोकराज्य
2) The Indian Journal of Political Science

वृत्तपत्रे लेख:

1) दै. लोकमत
2) दै. सकाळ लेख
3) दै. लोकसत्ता लेख
4) दै. पुण्यनगरी
5) टाईम्स ऑफ इंडिया

वेबसाईट:

1) https://en.wikipedia.org
2) http://parliament of india.nic.in/ Is/debates

*** संशोधक ***
अनिल नारायणराव पंडित
पीपल्स कॉलेज, नांदेड

*** मार्गदर्शक ***
प्रा. डॉ. महादेव बी. बेलखेडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख पानसरे
महाविद्यालय, अर्जापूर
ता. बिलोली जि.नांदेड